
WMAI

Promoting Marathi Culture


Vol 1 Issue 1, July 2023
Quarterly Newsletter
















**Vaibhav Marathe Arts**

Hi, I am Vaibhav, born in Dombivli and lived there till I migrated to UK for further studies. I always loved drawing and painting, and took formal education as a student of Diploma in commercial arts.

After finishing arts college, career took me away from traditional arts as I worked in various branches of creative industry such as illustration then advertising and eventually into animation and computer graphics. I always kept going back to art in one way or the other but never followed it or thought one day I would get back to it more seriously.

After living in London for few years I moved to Wellington in 2015 with my wife, Deepali to work at Weta FX as a visual effects compositor. We came here only for a year or more specifically to work on James Cameron's movie - Avatar. We fell in love with this city and made it our home.

Fast forward to 2020 when entire world went through crazy times I used spare time to my advantage and grabbed pencil and old drawing paper and started drawing. I was shocked to see how quickly drawing came back to me. After that I was hooked onto it. I started exploring various painting mediums such as water colours, oil paints and pastel pencils.

Arts clears my mind, relaxes my body and nurtures my soul. It gives me energy to look at the world in a different way. I am passionate about my art and always trying to learn new ways to improve my skills. I like painting landscape paintings, portraits of people and their furry family and anything else which challenges me and my skills.

I am very thankful to WMAI for giving platform to showcase my work.

We would like to express our sincere gratitude for attending the Mandar Bhide stand-up show at 'The Fringe Bar'. Your presence and support helped to make it a success. Hope you have had laughed out loud and enjoyed the show. Thank you for being a part of it!







WMAI

वमाय प्रस्तुत





Coming to Cinemas in Wellington

Date & Time: Sunday, 16th July at 1pm
Monterey Cinemas, Upper Hutt

Contact WMAI Committee for Tickets

WMAI
Promoting Marathi Culture

Vol 1 Issue 1, July 2023
Quarterly Newsletter





# दिव्यांची रसमलाई

आषाढातला शेवटचा दिवस म्हणजे दिव्यांची अमावस्या. या सुरेख सणाला आता गटारी अमावस्या या नावानं ओळखलं जातं. आपल्या रोजच्या आयुष्यात ज्या-ज्या गोष्टींचा वापर होतो त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपल्याकडे वेगवेगळे सण पाळले जातात. शेतात वर्षभर राबणा-या बैलासाठी पोळा किंवा बेंदूर, शेतक-याचा मित्र असलेल्या नागोबाच्या पूजेचा नागपंचमी, चुलीला विश्रांती द्यायची म्हणून शिळासप्तमी तसंच आपल्याला कायम उजेड देणा-या दिव्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिव्याची अमावस्या. आता विजेचे दिवे असतात. पण ज्या काळी वीज नव्हती तेव्हा तेलवात करून वापरण्यात येणा-या दिव्यांमुळेच उजेड होत असे.
आजच्या दिवशी घरातले सगळे दिवे घासून पुसून लख्ख करायचे आणि मल तेलवात करून उजळायचे, त्यांची पूजा करायची अशी जुनी प्रथा आहे. माझी आजी कणकेचे गूळ घालून दिवे करायची, ते उकडून, त्यात तूप घालून, वात पेटवून आम्हाला ओवाळायची आणि नंतर ते दिवे खायला द्यायची. आता ही प्रथा कालबाह्य झाली आहे. कारण वर म्हटलं तसं विजेचे दिवे असताना या दिव्यांना आता तितकंसं महत्व उरलेलं नाही. पण जुनी परंपरा म्हणून त्या-त्या सणाला ते-ते ठराविक पदार्थ मी करतेच.

सायली राजाध्यक्ष

Click on the link for detailed recipe
Divyanchi Rasmalai







## GO VIBRANT SAREE WALK

रविवार 21 मे 2023 ची सकाळ उजाडली तीच थंडी, जोरदार पावसाच्या सरी आणी सोसाट्याचा वारा घेऊनच. मनात जरी थोडी धाकधूक होती तरीही प्रचंड विश्वास देखील होता की थोड्याच वेळात हे सगळं थांबून एक छान दिवस सुरु होणार आहे. कारण त्या सकाळी मी आणी माझ्यासोबत 80 - 90 बायका, आम्ही सगळ्या साडी नेसून, वेलिंगटन च्या वॉटरफ्रंट वरून 5 किलोमीटर चालणार होतो. हवामान खराब असून देखील, सगळ्याजणी एका विश्वासाने ठरल्याप्रमाणे फ्रँक किट्स पार्क मधे जमा झाल्या. फोटो काढून झाल्यावर सकाळी दहाच्या सुमारास आम्ही चालायला सुरवात केल्यावर आम्हाला घाबरवण्यासाठीच जणू, पुन्हा पावसाचा थोडा शिडकावा झाला. पण आमचा सगळ्यांचा ठाम निर्धार बघून तो ही वरमला. पाऊस थांबला. वारा थांबला. आणी चक्क मस्तपैकी ऊन पडलं. हसत खेळत, फोटो काढत, रील्स सुद्धा बनवत आम्ही सगळ्याजणी आपल्या साड्या मिरवत चालू लागलो.
"साडी " हा माझा फारच जिव्हाळ्याचा विषय. वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या आपल्या कडे असाव्यात ही माझी खूप वर्षापासूनची इच्छा. वेलिंगटन मध्ये मला अशा विविध प्रकारच्या साडया कुठेच मिळत नव्हत्या. हाताने रंगवलेल्या आर्ट साडया, हातमागावर विणकारांनी विणलेल्या साडया मिळणं तर जणू अशक्यच होतं. मी स्वतःसाठी ह्या वेगवेगळ्या साड्यांचा शोध घेत होते. ह्या साडया मिळवत असताना मला जाणवलं की माझ्याप्रमाणेच कितीतरी जणींना ह्या अशा साडया आवडतात पण त्या इथे उपलब्ध नसल्याने त्या नेसू शकत नाहीत. मग मी ठरवलं की आपणच ह्या साड्या भारताच्या विविध भागातून मागवून घेऊ. म्हणजे इथे ह्या साडया उपलब्ध तर होतीलच पण त्याच बरोबर भारतातील जे कलाकार ह्या साड्यांवर सुंदर मधुबनी, पट्टचित्र, वारली, सौरा, कलमकारी, गोंद चित्र रंगवतात, जे विणकर हातमागावर डोंगरीया, चंदेरी, महेश्वरी, जामदानी, डोलाबेदी, इकत, बोमकाई, दोनकली सारख्या अनेक सुंदर साड्या बनवतात, त्या सर्व कलाकारांना आणी त्यांच्या कलेला आपण इथल्या लोकांसमोर आणूया. ह्याच विचारातून मी "गो व्हायबरंट" ची सुरवात केली. वेलिंगटन मधील माझ्या मैत्रिणींनी माझ्या ह्या उपक्रमाला छान साथ दिली.
एप्रिल 2023 मधे मधुस्मिता जेना ह्या इंग्लंड मधे मँचेस्टर मॅरेथॉन साडी नेसून 42 किलोमीटर धावल्याची बातमी वाचली आणी खूप अभिमान वाटला. मनात विचार आला की जर एक भारतीय स्त्री साडी नेसून मॅरेथॉन मधे धावू शकते मग आपण कमीतकमी चालू तरी नक्कीच शकतो. हा विचार मी माझ्या गो व्हायबरंट ग्रुपवर मांडला आणी मला सगळ्यांचा खूपच छान प्रतिसाद मिळाला. मी लगेच दिवस ठरवला आणी कामाला लागले.
वेलिंगटन सिटी कौन्सिल, न्यूझीलंड पोलीस, वॉटरफ्रंट ऑपेरेशन, ह्या सगळ्याकडून आवश्यक ती परवानगी, फुटपाथ लायसन्स वगैरे मिळवलं. तानिया दिवेकर, अनुष्का आणी त्यांचे वैद्यकीय शिक्षण घेणारे मित्र मेडिकल वोलेंटिअर म्हणून काम करायला तयार झाले. रौनक ने काहीही मोबदला न घेता फोटो काढून देण्याची तयारी दर्शविली. स्वाद किचन च्या जयेशभाईंनी सगळ्या महिलांसाठी चहा ची सोय स्वखर्चाने केली. सगळी तयारी झाली. राजश्री बारपांडे ने ब्रेस्ट कँसर फाउंडेशन साठी फंड गोळा करण्याची संकल्पना मांडली जी सगळ्यांना आवडली. साडी वॉक मध्ये सहभागी होणाऱ्या सर्व महिलांकडून प्रत्येकी 5 डॉलर वर्गणी जमा करून ब्रेस्ट कँसर फाउंडेशन साठी फंड गोळा करण्याचे ठरले.
साडी वॉक ची माहिती वेलिंगटन मधे पसरली आणी बऱ्याच महिलांनी ह्यात सहभागी होण्याची इच्छा दाखवली. 14 वर्षांच्या मुलींपासून 78 वर्षांच्या तरुणीपर्यंत सगळ्यांनी ह्यात उत्साहाने भाग घेतला. ह्या सगळ्यांचा मला फार अभिमान वाटतो आणी माझ्या ह्या कल्पनेला त्यांनी जी साथ दिली त्यासाठी त्या सगळ्यांची मी खूप आभारी सुद्धा आहे.
मी फक्त एक कल्पना मांडली पण ती यशस्वी केली ह्या सगळ्याजणींनी. भारतीय स्त्रीच्या अभिमानाचे प्रतीक असलेली साडी नेसून पाच किलोमीटर चा हा वॉक यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सगळ्यांचे अभिनंदन.
हा साडी वॉक प्रत्येक वर्षी व्हावा अशी इच्छा अनेकजणींनी व्यक्त केली आहे त्यामुळे पुढच्या वर्षीही मी हा साडी वॉक पुन्हा आयोजित करेन हे नक्कीच.

By Jyoti Gosavi



www.facebook.com/nzwmai
www.wmai.site